**नि.दिवाणी दावा क्रं.५२/२०१३**

**नि. क्रं.६९**

**:: प्रतिवादीकरिता उर्वरीत सरतपास अधिवक्ता श्री. बी.सी. अपसिंगेकर यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

११. आता मला खरेदीखत क्र.७१८/२००८ हे दाखविले. हे तेच आहे. त्यावर माझी सही लिहून घेणार म्हणून आहे. (साक्षीदाराने खरेदीखताच्या अनुषंगाने शपथपत्रामध्ये सविस्तर कथन केलेले आहे.) सबब सदर खरेदीखतास **नि.७०** देण्यात येते.

**:: वादीकरिता उलटतपास अधिवक्ता श्री. डी.एन. कांबळे यांच्यामार्फत शपथेवर सुरू. ::**

१२. माझे शिक्षण एम.ए. बी.एड. पर्यंत झाले. रंजित व अनिल हे राजेंद्रच्या पहिल्या पत्नीचे मुलं आहेत. संदिप आणि प्रदिप हे राजेंद्र व कस्तुराबाई यांची मुले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, वादी यांना दावा जमीन वाडवडिलांकडून आलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, नरसिंगरावच्या मृत्यूनंतर दावा जमीन राजेंद्रच्या नावे वारसा हक्काने आली होती. हे म्हणणे खरे नाही की, मी खरेदीखताकरिता वादीची संमती घेतली नव्हती. मी लेखी संमती घेतलेली नाही. माझ्याकडे वादीची संमती घेतल्याबाबत कागदपत्र नाही. हे म्हणणे खरे नाही की, राजेंद्रला दारू पिण्याची सवय होती. हे म्हणणे खरे नाही की, मी राजेंद्रच्या वाईट सवयीचा गैरफायदा घेतला आणि खरेदीखत करून घेतले. हे म्हणणे खरे नाही की, वादीचा मी विकत घेतलेल्या जमिनीमध्ये सहावा हिस्सा आहे. हे म्हणणे खरे नाही की, वादीवर माझे खरेदीखत बंधनकारक नाही. हे म्हणणे खरे नाही की, वादीने वारंवार मला त्याचा हिस्सा मागितला आणि त्याचा बैनामा करून द्या असे म्हटले होते.

१३. हे म्हणणे खरे नाही की, वादी माझ्याकडे पैसे मागण्यासाठी आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, वादी व प्रतिवादी क्र.१ ला पैशाची गरज नव्हती.

हे म्हणणे खरे नाही की, मी संबंधीत अधिकाऱ्याला हाताशी धरून खरेदीखताची नोंद घेतली आणि त्याकरिता वादी व ईतरांना नोटीस काढल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटे शपथपत्र दाखल केले आणि खोटी साक्ष दिली.

उलटतपास पूर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत सा.वा.दा.ख.व.ब.अ.क.केले.

( श.अ. सुरजुसे ) ( श.अ. सुरजुसे )

दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**. दिवाणी न्यायाधीश क. स्तर, **देवणी**.

दि.०८/०४/२०२६.